P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad, Maharashtra - 41

प्रेसनोट दिनांक – ०२/१०/२०२६

दि. ०१/१०/२०२६ रोजी राञौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे

०१.

पोस्टे व गु रजि.नं.	:-	चिंचवड ५९२/२०२६भारतीय न्याय संहिता सन २०२३ चे कलम १०९(१) ११८(१), ११५(२), ३५२,३५१,१८९,१९०,१९१(३), आर्म ॲक्ट ४(२५)(२७)क्रिमीनल लॉ ॲमेंडमेंट कलम ३,७, महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३) सह १३५ प्रमाणे.
गु.घ.ता.वेळ व ठि.	:-	दि. ३०/०९/२०२६ रोजी १७.३० वा. चे सुमारास न्यु वुड हॉटेल शेजारील, वाल्हेकरवाडी चिंचवड, पुणे येथील एच. पी. पेट्रोलपंप येथे व फिर्यादी यांचे राहते घराचे समोर चिंचवडे फॉर्म समोर, एच पी पेट्रोलपंपाच्या पाठीमागे, वाल्हेकरवाडी, चिंचवड, पुणे येथे.
गुन्हा दाखल	:-	दि.०१/१०/२०२६ रोजी ०१.४९ वा
फिर्यादी	:-	ईस्माईल गणी शेख, वय ४७ वर्षे, व्यवसाय प्लंबर, रा. चिंचवडे फॉर्म समोर, एच पी पेट्रोलपंपाच्या पाठीमागे, वाल्हेकरवाडी, चिंचवड, पुणे
आरोपी	:-	१.अभिषेक लालमण यादव वय १९ वर्ष रा चव्हाण नगर देहुगाव ता हवेली जि पुणे २. नागेश व्यंकटराव चोपडे वय २२ वर्ष रा चिखली गावठाण ता हवेली जि पुणे ३. अशितोश दयानंद शितोळे वय २५ वर्ष रा मातोश्री मेडीकल जवळ दुर्गानगर चिखली पुणे ४. अभिषेक लाल गिरगोसावी वय १९ वर्ष रा मोरया प्रॉपर्टी येलवाडी देहुगाव पुणे ५. विधीसंघर्षीत बालक आरोपी क्र १ ते ४ अटक आहेत
तपशिल	:-	नमुद ता वेळीव ठिकाणी यातील फिर्यादी यांचा मुलगा इरफान याचे आरोपी अभिषेक यादव याची पत्नी निशा हिच्याशी पुन्हा अफेयर सुरु असल्याचा संशयावरुन अभिषेक यादव, अभिषेक शितोळे, नागेश चोपडे व ०२ अनोळखी इसमांनी इरफान यास कोयत्याने पाठीत- मणक्याजवळ, उजवे हाताचे अंगठयास, डावे हाताचे पंजास व हाताचे कोप-याजवळ तसेच डोक्याच्या डावे बाजुस कपाळावर वार करुन जीवे मारण्याचा प्रयत्न करुन हाताने, लाथा-बुक्कयांनी मारहाण केली तसेच इरफान जीव वाचविण्यासाठी पळत असताना त्याचे मागे पाठलाग करीत करुन व हातात कोयते फिरवुन"तुला किती पळायचे पळ, तुला जिवंत सोडणार नाही, कोणी जर मध्ये आले तर कोणालाच सोडणार नाही" असे बोलुन दहशत करुन, आरडाओरडा, शिवीगाळ करुन धमकी दिली. फिर्यादी व त्यांचा भाऊ अहमद असे इरफान यास वाचविण्यासाठी गेले असता, त्यांना हि कोयत्याने मारुन जखमी केले म्हणुन
त.अधिकारी/अंमलदार	:-	सपोनि शेरखाने ९०९६३६५३४१

०२.

पोस्टे व गु रजि.नं.	:-	उत्तर म्हाळुंगे १२४/२०२६ कलम - भा न्या सं कलम १०९, ११५(२), ३५१(२), ३५२ ३(५) भादवि कलम ३०७ ३२३ ५०४ ५०६ ३४
गु.घ.ता.वेळ व ठि.	:-	दि ३०/०९/२०२६ रोजी रात्रौ ८.३० वा. च्या सुमारास महाळुंगे स्मशान भुमी जवळील रोडवर व मोकळया शेतात, महाळुंगे, ता. खेड, जिल्हा पुणे.
गुन्हा दाखल	:-	दि.०१/१०/२०२६ रोजी ०४.३७ वा
फिर्यादी	:-	राहुल शामकुमार निषाद, वय २३ वर्षे, व्यवसाय एसडब्यु इंजिनिअरींग कंपनी, एचपी चौक, सावरदरी रोड, रा. महाळुंगे (इं), ता. खेड, जि. पुणे. मुळगाव मु. पो. विन्ध्यांचल, ता. कटर कोतवाली, जि. मिर्झापुर, राज्य उत्तर प्रदेश.
आरोपी	:-	१. ओम चंद्रकांत बहादुरे, वय २४ वर्षे, रा.वार्ड नं.१६ मिलींदनगर मेहेकर ता. मेहेकर, जि. बुलढाणा २. अनिल रामराव आघाडे वय ५४ वर्षे, रा. .वार्ड नं.१६ मिलींदनगर मेहेकर ता. मेहेकर, जि. बुलढाणा आरोपी क्र १ व २ अटक आहेत
तपशिल	:-	नमुद ता वेळी व ठिकाणी आरोपी याने फिर्यादीच्या गळयाचे खाली चाकूने वार करुन आरोपी क्र ०२ याने फिर्यादीच्या दोन्ही हातावर चाकुने वार करुन, फिर्यादीस हाताने मारहाण करुन, फिर्यादीला धमकी व शिविगाळ

करुन सदर आरोपींनी मिळून फिर्यादीस जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणून
एफआरआय मध्ये फिर्यादी यांना मारहाण केले बाबत कोणतेही कारण नमुद करणेत आलेले नाही

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि ढोले ८८९८११४७१०पोउपनि मुल्ला ८९७५७००४३४

०३.

पोस्टे व गु रजि.नं. :- उत्तर चाकण ९२१/२०२६ बी.एन.एस. कलम ३१८(४), २८७, ३(५) सह जिवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ३,७ सह (पुरवठा व वितरण नियमन) आदेश २००० चे कलम ३,४.५.६.७. प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि ३०/०९/२०२६ रोजी १८.५० वा चे सुमारास मौजे बिरदवाडी गावचे हद्दित आकाश पवार याचे भाडयाचे खोलीमध्ये बिरदवडी ता.खेड जि.पुणे येथे

गुन्हा दाखल :- दि.०१/१०/२०२६ रोजी २३.४६ वा.

फिर्यादी :- बाळु दुंदा मराडे, वय ४० वर्षे पोलीस अंमलदार २७३० नेम चाकण उत्तर पोलीस स्टेशन पिंपरी चिंचवड

आरोपी :- विधीसंघर्ष बालक

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी क्र १ व विधीसंघर्षीत बालक क्र २ यांने व्यवसायीक वापराचे गॅसचे टाकी मधुन लाल रंगाचे लहान टाकी मध्ये काळया रंगाचे नोझल पाईप लावुन स्वताचे फयद्यासाठी लोकांचे जिवीतास धोका निर्माण होईल अशा प्रकारे विनापरवाना घरगुती वापराचे ज्वालाग्राही गॅस सिलेंडर मधुन लहान गॅस टाकीत भरीत असताना १०,५००/-रु. गॅसचे टाक्यांसह मिळुन आला असुन त्याने गॅस या जिवनावश्यक वस्तुबाबत शासन व ग्राहकांची फसवणुक केली आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि बुरुड ८६२४०५०१२९

०४.

पोस्टे व गु रजि.नं. :- एम.आय.डी. सी भोसरी ७४९/२०२६ बीएनएस कलम ३१६(२) प्रमाणे.
भादवि कलम ४०६

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.३०/०९/२०२६ रोजी पहाटे ०३:०० वा. चे सुमारास बरगर किंग कॅफे समोर, भारत माता चौक, मोशी, पुणे येथे घडला असे

गुन्हा दाखल :- दि.०१/१०/२०२६ रोजी २२.४८ वा.

फिर्यादी :- मयुर लालु झोले, वय २२ वर्षे, धंदा शिक्षण, रा.अदिवासी मुलांचे शासकिय वस्तीगृह, सेक्टर नं.६,मोशी प्राधीकरण, पुणे. मुळगाव - मु.पो.वाकी, ता.अकोले, जि.अहिल्यानगर.

आरोपी :- सोन्या पाटील, वय अंदाजे २२ वर्षे, रा.चाकण, पुणे.

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीचा मित्र आरोपी याच्याकडे फिर्यादीने विश्वासाने सोपवलेली ३०,०००/- रु.किं.ची होंडा कंपनीची स्कुटी नं. एम.एच.१४ एम.यु. १८३७ ही घेऊन तो गेला असुन त्याने मला स्कुटी परत न करता स्वतःच्या फायदयाकरीता वापरत आहे. मी त्याला कॉल केला असता "तुझ्याकडील ॲक्टीव्हा स्कुटी नं. एम.एच.१४ एम.यु. १८३७ ही माझ्याकडे नसुन मला पुन्हा कॉल करु नको." असे म्हणुन मला उडवाउडवीची उत्तरे देऊन आता त्याने त्याचा मोबाईल बंद केला असुन मी त्याच्याकडे विश्वासाने सोपवलेली स्कुटी मला परत न करता स्वतःच्या फायदयाकरीता घेऊन गेला आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोहवा/१६०४ चौधरी

०५.

पोस्टे व गु रजि.नं. :- सांगवी ६२०/२०२६ भारतीय न्याय संहिता २०२३ कलम ११८(२), ११५(२), ३५२, सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३) सह १३५भादवी कलम- ३२६,३२३

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि-०१/१०/२०२६ रोजी दुपारी १४/०० वाजताचे सुमारास पवनानगर रहाटणी पुणे येथे

गुन्हा दाखल :- दि ०१/१०/२०२६ रोजी १९/०३ वा

फिर्यादी :- महिला फिर्यादी वय-३३ वर्ष, व्यवसाय-धुणी -भांडी, रा-पवनानगर रहाटणी ता.हवेली जि-पुणे

आरोपी :- रवी दत्तु जाधव वय ४० वर्ष, रा.सध्या शहाड फाटक, भंगी पाडा, कल्याण मुंबई आरोपी अटक आहे

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे पती नामे रवी दत्तु जाधव वय ४० वर्ष, याने फिर्यादी यांच्या चारित्र्यावर संशय घेवुन तु काम सोडुन दे असे म्हणुन शिवीगाळ व लाथा-बुक्क्यांनी मारहान करुन किचनवरील चाकु घेवनु फिर्यादी यांच्या डाव्या हाताच्या करंगळी, उजव्या हाताच्या तळव्याच्या मागील बाजुस व मनगटाच्या वरील भागावर वार करुन गंभीर जखमी केले, म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउनि जावळे ८६०५४२२६२२

०६.

पोस्टे व गु रजि.नं. :- दापोडी ३४८/२०२६ भारतीय न्याय संहिता सन २०२३ चे कलम ११८(१), ३(५) भादवि कलम ३२४ ३४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.३०/०९/२०२६ रोजी चे २०:०० वा. च्या सुमारास फुगेवाडी ब्रिजखाली, दापोडी

गुन्हा दाखल :- दि.०१/१०/२०२६ रोजी ११.०८ वा

फिर्यादी :- श्री योगेश बापु अय्याळी, वय- ३० वर्षे, धंदा- नोकरी रा. संजयनगर, बौध्द विहारच्या मागे, जामा मस्जिद समोर, फुगेवाडी, पुणे

आरोपी :- १) मुकेश चंदन परदेशी
२) चंदन घनश्याम परदेशी
३) महिला अरोपी
४) महिला आरोपी

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे त्यांच्या मिञासोबत गप्पा मारत बसले होते त्याठिकाणी आरोपी क्र १ हा तिथे आला व फिर्यादी यांना म्हणाला की ही जागा तुझ्या बापाची आहे का तु येथे का बसला आहे असे म्हणुन चिडुन जावुन त्यांनी फिर्यादी यांना मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यातुन त्यांनी कश्याच्या तरी सहाय्याने त्यांचे डोक्यास मारले. त्यामुळे त्याचे डोक्यातुन रक्त येवु लागल्यामुळे त्याला वाय.सी.एम हॉस्पिटल येथे आणुन त्यांच्यावर औषधउपचार केले. त्यानंतर दापोडी पोलीस ठाणे येथून जबाब घेण्याकरिता कर्मचारी आले असता झाले भांडणामध्ये आरोपी क्र १ ते ४ यांनी आपआपसात संगणमंत करुन फिर्यादीस लाथाबूक्यानी मारहाण करुन आरोपी क्र १ याने कश्याच्या तरी सहाय्याने डोक्यास, पाठीवर, हातावर मारहाण करुन जखमी केले आहे म्हणून

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि पाटील ९७३०८१५५५० पोहवा/९१५ मापारे ९९२३२०३८५२

०७.

पोस्टे व गु रजि.नं. :- चिंचवड ५९४/२०२६भारतीय न्याय संहिता कलम ११८(१), ३५१(२) प्रमाणे भादवि कलम ३२४ ५०४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.३०/०९/२०२६ रोजी १९.३० वा.चे सुमारास १३०/०१, शुभारंभ कॉलनी , गुरुद्वारा चौक, चिंचवड येथील इमारतीच्या समोर रोडलगत

गुन्हा दाखल :- दि.०१/१०/२०२६ रोजी ०३.१८ वा

फिर्यादी :- मनीष राजेंद्र बावीस्कर वय २६ वर्ष, धंदा- नोकरी, रा. मुक्ताईनगर, मानराज पार्क जळगाव

आरोपी :- अशोक पिसाळ

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी त्यांचा मित्र तन्मय चौधरी सह ते राहत असलेल्या सोसायटी येथील इमारतीच्या समोर रोडलगत गाडी पार्क करत असताना तेथील पलसर गाडीचा मालक आरोपी याने फिर्यादीशी पार्किंकवरुन वाद घातला व तेथेच पडलेल्या विटेने फिर्यादीच्या डाव्या डोळयाचे वरती डोक्याला विटकर मारुन जखम केली व फिर्यादी यांना रूम खाली करण्याची धमकी दिली म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि ढवण ७७२२०१११५० पोहवा/९९६ लोहकरे ९६८९९०४०८०

०८.

पोस्टे व गु रजि.नं. :- निगडी ८५८/२०२६ भा.न्याय संहिता २०२३ कलम ११८(१), ११५(२) ३५२, ३५१(२), ३(५) प्रमाणे.

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.०१/१०/२०२६ रोजी १२/३०. वा. सु. नॅशनल स्विट ॲण्ड ड्रायफुट नावाचे गाळा नं १२, निगडी बस स्टॉप मागे बी जी कॉर्नरनिगडी पुणे येथे

गुन्हा दाखल :- दि.०१/१०/२०२६ रोजी २३.३४ वा

फिर्यादी :- महिला फिर्यादी वय ४९ वर्षे, गृहिणी, रा. दुर्गा निवास, प्लॉट नं ३७७, मिनाताई ठाकरे जलतरण जवळ, यमुनानगर निगडी पुणे

आरोपी :- १) गणेशराम कानाराम चौधरी वय ६८ वर्षे
२) हितेश गणेशराम चौधरी वय ३७ वर्षे
३) गजेंद्र गणेशराम चौधरी, वय ३४ वर्षे सर्व रा. अ प्रभाग कार्यालय जवळ, ग्राहकबाझार दुकाणाचे वर प्राधिकरण पुणे
४. शांतीलाल पुर्ण नाव पत्ता माहित नाही आरोपी क्र २ अटक आहे

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचे चुलत सासरे आरोपीक्र १ चुलत दिर आरोपी क्र २, ३ व ४ यांनी येवुन फिर्यादीचे पती यास दुकाणाचे सन २०२२ पासुन आज पर्यंत भाडे मागणीचे कारणा वरुन पाठविलेले नोटीसीस उत्तर सादर केले असता. त्याचा राग मनात धरुन दुकाणात येवुन फिर्यादी यांचे पतीस झा-याने प्लास्टिक पॅकिंग मशिन व वजनकाटया वरिल स्टिलची प्लेट, लाथा-बुक्यांनी मारुन, शिवीगाळ करुन, धमकी देवुन बेशुध्द होई पर्यंत मारुन डोक्यास दुखापत केली असुन, फिर्यादी दुकाणात आत जात असताना आरोपी क्र

३ याने फिर्यादीचा उजवा हात पकडुन ओढुन फिर्यादीचे हातातील बांगडी तोडली असुन शिवीगाळ करुन कानाखाली मारुन, क्वाऊंटर वर असणारी प्लॅस्टिक पॅकिग मशिन उचलुन, आरापी क्र २ याने परत फिर्यादीस हाताने ढकलुन अंगावर धावुन आला आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार ०९.	:-	पोउपनि वळसे ८७८८४५८९६४ पोहवा/१०९० पाटील ९७६४६६५१९१
पोस्टे व गु रजि.नं.	:-	निगडी ८४८/२०२६ भा.न्या.सं. २०२३ कलम १८९(२), १८९(४), १९१(२), १९१(३), १९०, ३२४(४), ३२४(६),३५१(२)(३) सह भारतीय हत्यार कायदाकलम ४(२५),२७ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३),१३५ सह क्रिमीनल अमेंडमेंट ॲक्ट कलम ३,७ प्रमाणे.
गु.घ.ता.वेळ व ठि.	:-	दि ३०/९/२०२६ रोजी सायं ५.२० वा च्या सुमारास वृंदावन सोसायटी समोर, रामेश्वर मंदिराजवळ, चिंचवड, पुणे येथे.
गुन्हा दाखल	:-	दि.०१/१०/२०२६ रोजी ०२.२६ वा
फिर्यादी	:-	ऋषिकेश संजय वराडी वय २८ वर्षे, धंदा दुचाकी गॅरेज चालक, रा. फ्लॅट नं. ७, वृंदावन सोसायटी, रामेश्वर मंदिराजवळ, संभाजीनगर चिंचवड, पुणे,
आरोपी	:-	१) नागेश चोपडे, २) अभिषेक यादव, ३) अभिषेक गोसावी, ४) सिद्धार्थ माने व त्यांचा ५)एक साथीदार.
तपशिल	:-	नमुद ता वेळी वठिकाणी यातील आरोपी क्र १ ते ५ यांनी रस्त्याच्या कडेला पार्क केलेल्या माझ्या फॉक्स वॅगन वेंटोकार क्रमांक एम एच १४ सी एस १६२५ या कारच्या पुढील काचेवर व बोनेटवर लोखंडी कोयत्याने मारून तोडफोड करून फिर्यादीचे अंदाजे रुपये २५,०००/- चे आर्थिक नुकसान केले आहे. तसेच त्यांनी तेथे उपस्थित नागरिकांना जीवे मारण्याच्या धमक्या देऊन सार्वजनिक शांतता भंग केली व परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण केले आहे म्हणून
त.अधिकारी/अंमलदार १०	:-	पोउपनि गायकवाड ७०२०२३७५३६
पोस्टे व गु रजि.नं.	:-	शिरगाव २८८/२०२६ भा न्याय संहिता कायदा कलम १०६, २८१ प्रमाणे
गु.घ.ता.वेळ व ठि.	:-	दि ३०/०९/२०२६ रोजी सायं ५.३० वा. चे सु।। मौजे बेबेडोहळ ता. मावळ जि. पुणे गावचे हद्दीत आढले खुर्द ते बेबेडोहळ रोडवर गारकेल माथा येथे
गुन्हा दाखल	:-	दि.०१/१०/२०२६ रोजी ००.५२ वा
फिर्यादी	:-	आकाश मारुती घोटकुले वय ३२ वर्षे धंदा - शेती रा. आढले खुर्द, घोटकुलेवाडी ता. मावळ जि. पुणे
आरोपी	:-	राजु दत्तु घोटकुले वय ४६ वर्षे रा. आढले खुर्द ता. मावळ जि. पुणे आरोपी मयत आहे
तपशिल	:-	नमुद ता वेळीव ठिकाणी यातील फिर्यादी यांचे चुलते आरोपी याने येथे जॉण्डेअर ट्रॅक्टर नंबर एम.एच.१४ डी.एच.३७०८ हा बेबेडोहळ बाजुकडे चालवित घेउन जात असताना तो हयगयीने, अविचाराने, चालवीत असताना त्यांना ट्रॅक्टर कंट्रोल न झाल्याने ट्रॅक्टर रोडवरून खाली गटारात गेला असता चुलते राजु घोटकुले यांचे डोके स्टेरींगवर आदळुन जखमी होउन स्वतःचे मृत्युस कारणीभुत झाले आहेत.म्हणुन
त.अधिकारी/अंमलदार ११	:-	पोना/१३९७ परदेशी ७३५०५७४२२० पोउपनि/ पारखे ९९६०९८६५३५
पोस्टे व गु रजि.नं.	:-	निगडी ८५१/२०२६ भा.न्याय संहिता २०२३ कलम २८१,१२५(अ),१२५(ब), मो.वा.का १८४, १३४ (अ)(ब), ११९/१७७ प्रमाणे.
गु.घ.ता.वेळ व ठि.	:-	दि २७/०९/२०२६ रोजी रात्रौ ८.३० वा च्या सुमारास यमुनानगर येथील रुपीनगर चौक ते भक्ती शक्तीकडे जाणारे रोडचे सर्व्हिस रोडवरुन बिल्डींग नं ३६,यमुनानगर,निगडी,पुणे.
गुन्हा दाखल	:-	दि ०१/१०/२०२६ रोजी ११.३८ वा
फिर्यादी	:-	सदानंद भिमराव कोकणे वय ६९ वर्षे, रिटायर्ड, रा.फलॅट नं २, बि नं ४९,अजंठा सोसायटी,यमुनानगर,निगडी, पुणे
आरोपी	:-	अज्ञात वाहना वरील चालक
तपशिल	:-	नमुद ता वेळी व ठिकाणीयातील फिर्यादी हे ने पायी घरी जात असताना कोणत्या तरी अज्ञात वाहनावरील चालकाने त्याचे ताब्यातील वाहन वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करून हयगयीने बेदरकारपणे रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून चालवून फिर्यादीस पाठीमागुन धडक देवुन फिर्यादीचे किरकोळ व गंभीर दुखापतीस कारणीभुत होवुन अपघात ठिकाणी न थांबता निघून गेला आहे. म्हणून
त.अधिकारी/अंमलदार	:-	पोउपनि वळसे ७५८८५०७६५२ पोहवा/१०८४ रावते ८८८८८०८१११

पोस्टे व गु रजि.नं. :- चिंचवड ५९५/२०२६ भा.न्या.सं कलम २८१, १२५(अ)(ब),३२४(४)सह मोटार वाहन कायदा कलम १८४, ११९/१७७ भा.द.वि.सं.क २७९,३३७,३३८,४२७

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि २९/०९/२०२६ रोजी सकाळी १७/०० वा चे सुमारास एस.के.एफ कंपनीकडुन चाफेकर चौकाकडे जात असताना असिम विश्व सोसाईटी समोर चिंचवड

गुन्हा दाखल :- दि ०१/१०/२०२६ रोजी ०३.४४ वा.

फिर्यादी :- महिला फिर्यादी वय ३६ वर्ष व्यवसाय नरेकरी रा स्कीम नं ०९ बिल्डींग नं ०४ रुम नं १ विशाल बिल्डींग पुणे

आरोपी :- मोटार सायकल नं MH 14 LC 4537 वरील अनोळखी चालका विरूध्द.

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी वार्डन पंडित उबाळे याचे सोबत टु व्हीलर गाडि क्र MH11CU1762 ही चे वरुन एस.के.एफ कंपनीकडुन चाफेकर चौकाकडे जात असताना असिम विश्व सोसाईटी समोर चिंचवड पुणे येथे आलो असता टु व्हिलर गाडी क्र MH14 LC 4537 यावरील चालकाने आपली टु व्हिलर हि रहदारीच्या नियमांकडे दुर्लक्ष करुन हयगयीने अविचाराने, स्वतःचे व दुसरेचे जिवीतास धोका होईल अशी भरधाव वेगात चालवुन फिर्यादीस धडक मारुन उजव्या हाताचे दंडाजवळ फ्रॅक्चर करुन जखमी करणेस कारणीभुत झाला व फिर्यादी यांचे गाडीचे नुकसान केले म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- मपोउपनि डोंगरे ७७६६०९५५७७ पोहवा/१०७४ जाधव ८१८०३०४०७०

१३

पोस्टे व गु रजि.नं. :- चिंचवड ५९८/२०२६ भारतीयन्याय संहिता कलम १३२, ३५१(२), ३(५) भादवि कलम ३५३,५०६ ३४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.०१/१०/२०२६ रोजी ११.४५ वा.चे सुमारास चिंचवड पोलीस स्टेशन, चिंचवड,पुणे येथे

गुन्हा दाखल :- दि ०१/१०/२०२६ रोजी १५/१६ वा.

फिर्यादी :- महिला फिर्यादी मपोशि /१९९७ नेमणुक चिंचवड पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड आयुक्तालय,

आरोपी :- १. महिला आरोपी वय ३५ वर्ष
२. महिला आरोपी वय २१ वर्ष व्यवसाय ब्युटी पार्लर,
दोघी ही रा चव्हाण नगर, देहुगाव, ता. हवेली जि.पुणे आरोपी क्र १ व २ अटक आहेत

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी गु.र.नं. ५९२/२०२६ प्रमाणे दाखल गुन्हयातील पाहीजे आरोपी अभिषेक लालमान यादव, व त्यांच्या स्टाफ यांनी ताब्यात घेवुन चिंचवड पोलीस स्टेशन येथे आणुन हजर केले होते. सदर गुन्हयाचा तपास सपोनि शेरखाने हे करीत होते. तपासा दरम्यान यातील आरोपी यांनी गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांची वैदयकीय तपासणी करुन अटक करण्यात आली. त्या दरम्यान आरोपीची आई आरोपी क्र १ व आरोपीची बहीण आरोपी क्र २ हे चिंचवड पोलीस ठाणे येथे येवून अभिषेक यादव याच्या अटकेस अडथळा निर्माण व्हावा या करीता दोघींनी पोलीस ठाण्यात आवारात आराडा ओरड करुन आरोपी क्र २ ने तीचे मोबाईल मध्ये चित्रीकरण करुन स्वतः चे अंगावरील टि-शर्ट काढला व आरोपी क्र १ हिने पाय-या वरील लोखंडी रेलींगला स्वतःचे डोके आदळून स्वतःला जखमी केले. आरोपी क्र १ व २ यांनी गुन्हयाचे तपासात दबाव निर्माण करण्याच्या उददेशाने कामात अडथळा आणला व तुम्हा सर्व पोलीसांना पाहून घेईन व सर्वांच्या नोकरी घालवील अशी धमकी दिली म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि बारवकर ९८२३३५५०६०

१४

पोस्टे व गु रजि.नं. :- बावधन ५४१/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) प्रमाणे. भादवि कलम ३७९

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि २२/०९/२०२६ रोजी सकाळी ०९/४५ वा ते दि. ३०/०९/२०२६ रोजी रात्री ०८/०० वाचे दरम्यान. स्पीनी शोरून शेजारी शुभदावंदन बिल्डींगचे समोर चांदणी चौका जवळ बाणेर पुणे

गुन्हा दाखल :- दि.०१/१०/२०२६ रोजी १३/१९ वा

फिर्यादी :- श्री. रणजीत भगवान भंडलकर वय-३२ वर्षे, धंदा खाजगी काम,रा. शिवाजी घोसाळे यांचे खोलीत भाडयाने उत्तमनगर वारजे ता. हवेली, जि.पुणे

आरोपी :- अज्ञात चोरटा.

तपशिल :- नमुद ता वेळीव ठिकाणी यातील फिर्यादी यांची १०,०००/-रुपये किंमतीची होंडा कंपनीची काळया रंगाची एम एच ४२/ए एम-६९९८ ही लॉक व पार्क करुन ठेवली असता ती कोणीतरी अज्ञात इसमाने संमती शिवाय लबाडीच्या इरादयाने चोरी करुन नेली आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि सुरासे ७८७५२७७७१७

१५

पोस्टे व गु रजि.नं.	:-	काळेवाडी ५७७/२०२६ महाराष्ट्र जुगार ॲक्ट कलम १२ (अ)
गु.घ.ता.वेळ व ठि.	:-	दि.३०/०९/२०२६ रोजी २१.०० वा च्या सुमारास काका होम्स शेजारील मोकळ्या जागेत रहाटणी
गुन्हा दाखल	:-	दि ०१/१०/२०२६ रोजी ०८/५२ वा
फिर्यादी	:-	रामचंद्र मारुती तळपे, पोलीस नाईक १२९१, गुन्हे शाखा, युनिट-२, पिंपरी चिंचवड
आरोपी	:-	१.लोकेश धम्मरसिंह नेपाळी वय ५१ वर्षे रा. १६ नंबर बसस्टॉप थेरगाव पुणे २) बिरेंद्र बाहदुर सौद वय ३१ वर्षे रा. डुक्करखिंड पौडरोड कोथरुड पुणे ३) बलबाहदुर धानगडे जयगडी वय ४३ वर्षे रा. भाभा हॉस्पीटल जवळ, मॉर्डन कॉलनी, शिवाजीनगर पुणे ४) करण तुलाराम थापा वय ४३ वर्षे रा. काका होम्स जवळ तापकिरनगर काळेवाडी पुणे ५) दिपक ब्रिगेश परिवार वय २८ वर्षे रा. तापकिर नगर काळेवाडी पुणे
तपशिल	:-	नमुद ता वेळी व ठिकाणी आरोपीत हे स्वतःचे आर्थिक फायद्याकरिता ३१,०००/- रोख रक्कमव जुगाराचे साहित्यासह तीन पत्त्यांचा जुगार खेळत असताना मिळुन आले म्हणुन.
त.अधिकारी/अंमलदार	:-	पोउपनि नाईकनिंबाळकर ९८८१२५२९३०

१६

पोस्टे व गु रजि.नं.	:-	आळंदी ५०३/२०२५ भारतीय हत्यार कायदा कलम ३ (२५) महा पो का. क. ३७ (१) (३) सह १३५ प्रमाणे
गु.घ.ता.वेळ व ठि.	:-	दि ०१/१०/२०२६ रोजी १८.१० वाजता चे सुमारास बर्गे वस्ती चिबंळी येथे
गुन्हा दाखल	:-	गु न्हा दाखल – दि.०१.१०.२०२६ रोजी २३.१९०वा
फिर्यादी	:-	शेखर रोहीदास खराडे पोशि २२९५ नेमणूक गुन्हे शाखा युनिट ४ पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय
आरोपी	:-	१)अमोल संभाजी गायकवाड वय- २९ वर्षे रा. विक्रम बंड यांच्या भाडयाने घेतलेल्या रूमवर बर्गे वस्ती चिंबळी ता. खेड जि. पुणे मुळ रा. मु.पो. माहेगाव ता. कोपरगाव जि. अहिल्यानगर २)महेंद्र दिलीप कोळी वय- २७ वर्षे रा. प्रतिक मुटके यांच्या भाडयाने घेतलेल्या रूम वर मुटकेवाडी चाकण ता.खेड जि. पुणे मुळ रा. नायगाव ता.यावल जि. जळगाव आरोपी अटक आहे
तपशिल	:-	नमुद तारीख वेळी व ठिकाणी आरोपी नामे अमोल संभाजी गायकवाड वय- २९ वर्षे हा बर्गे वस्ती चिबंळी येथे खदानी जवळ ०१ देशी बनावटीचे गावठी पिस्टल व ०१ जिवंत काडतुस असा एकुण ५१,०००/- रू किंमतीचा अनाधिकाराने, विनापरवाना, बेकायदेशीर जवळ बाळगले असताना मिळून आला तसेच त्याच्याकडे सदर पिस्टल व काडतुस कोणाकडुन आणले आहे याबाबत विचारणा केली असता त्याने सांगितले की, सदरचे पिस्टल व काडतुस हे महेंद्र दिलीप कोळी वय- २७ वर्षे यांच्याकडुन घेतले आहे. त्याने मा.पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड यांचे कार्यालयीन आदेश जा.क्र. /विशा/बंदो/५५००४९७/२०२६ पिंपरी चिंचवड दि. २५/०९/२०२६ रोजीचे आदेशान्वये दि.३०/०९/२०२६ रोजीचे ००.०१ वा. ते दि.१३/१०/२०२६ रोजीचे २४.०० वा दरम्यान महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये आदेशाचे उल्लंघन केले म्हणून
त.अधिकारी/अंमलदार	:-	सपोनि वाघ. ७५८८०६६९४७ पोहवा/१८१४फुले ८५५२८१७०८०

१७

पोस्टे व गु रजि.नं.	:-	उत्तर चाकण ९२७/२०२६ एन.डी.पी.एस.अँक्ट कलम ८(क) २०(ब)(ii)(अ) प्रमाणे
गु.घ.ता.वेळ व ठि.	:-	दि ०१/१०/२०२६ रोजी १५.१० वा. चाकण गावचे हद्दीत चर्केश्वर मंदीराच्या कमानीजवळ झुडपाच्या आड चाकण ता.खेड जि.पुणे
गुन्हा दाखल	:-	दि ०१/१०/२०२६ रोजी १७.३० वा
फिर्यादी	:-	महेश शत्रुघन कोळी, वय २७ वर्षे, पो.शि./३५४७, नेमणुक चाकण उत्तर पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड
आरोपी	:-	सुखनंदन नमई पटेल, वय ३६ वर्षे, रा. शांताराम गोरे यांचे भाडयाचे खोलीत, दावडमळा, चाकण ता.खेड जि.पुणे. मुळ रा.मुरवाडी वॉर्ड नं. १४ ता.ढिमरखेडा, पोष्ट मुरवारी जि.कटनी मध्य प्रदेश.
तपशिल	:-	नमुद ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी याने गांजा या नावाचे अंमली पदार्थाचे कागदी सिगारेटच्या सहाय्याने उष्णता देवुन धुर तोंडातुन व नाकाद्वारे सोडत असतांना मिळुन आला म्हणुन
त.अधिकारी/अंमलदार	:-	मपोउपनि कदम ९५४५६००९९९ पोहवा/१२७४ आटोळे ९०११२३११९७

१८

पोस्टे व गु रजि.नं.	:-	उत्तर चाकण ९२८/२०२६ एन.डी.पी.एस.अँक्ट कलम ८(क) २०(ब)(ii)(अ) प्रमाणे
गु.घ.ता.वेळ व ठि.	:-	दि ०१/१०/२०२६ रोजी १८/३० वा. चाकण ब्राम्हणआळी माणिकचौक चाकण, ता. खेड, जि. पुणे .येथे

गुन्हा दाखल	:-	दि ०१/१०/२०२६ रोजी २३.२० वा
फिर्यादी	:-	सुमित गौतम जगझाप पो.शि ४५७४ नेमणुक चाकण उत्तर पोलीस स्टेशन पिंपरी
आरोपी	:-	१) निश उर्फ सोहेल राजु इनामदार, वय २७ वर्षे, रा. ब्राम्हणआळी, माणिक चौक चाकण, ता.खेड, जि.पुणे २) सलमान रफिक इनामदार रा.चाकण आरोपी क्र १ अटक आहे
तपशिल	:-	नमुद ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी क्र १ याने एकुण १५,०००/- रुपये किंमतीचा ५५१ ग्रॅम वजनाचा गांजा हा अंमली पदार्थ, अनाधिकाराने, बेकायदेशिररित्या विक्री करीता कब्जात बाळगलेला मिळुन आला व त्यांनी तो गांजा आरोपी क्र २ याचेकडुन आनलेचे सांगीतले म्हणुन
त.अधिकारी/अंमलदार	:-	श्रेणीपोउपनि बुरुड ९७६३६६९२७४ सपोफौज भवारी ९३२५१२०७८८

१९

पोस्टे व गु रजि.नं.	:-	काळेवाडी ५७८/२०२६ एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८(क), २२(ब)
गु.घ.ता.वेळ व ठि.	:-	दिनांक०१/१०/२०२६ रोजी ०५.१५ वा रावजी बारणे प्रशाला समोर, सुंदर कॉलनी, थेरगाव, पुणे
गुन्हा दाखल	:-	दिनांक०१/१०/२०२६ रोजी १३/०० वा.
फिर्यादी	:-	कृष्णा नारायण शितोळे, वय-४० वर्षे, पोलीस हवालदार ८१७, नेमणुक गुन्हे शाखा युनिट-२,पिंपरी चिंचवड
आरोपी	:-	रफिक करीम मुजावर, वय-४० वर्षे, सध्या ईलियास शेख यांच्या घराखाली, सिध्दार्थ बौध्द विहाराजवळ, डोंगरे कॉर्नर, पडवळ नगर, पुणे. मुळ राह गुंजोटी, तालुका-उमरगा, जिल्हा-धाराशिव आरोपी अटक आहे
तपशिल	:-	नमुद तारीख वेळी व ठिकाणी इसम नामे रफिक करीम मुजावर, वय-४० वर्षे, याचे ताब्यात कि. रु.१,००,०००/- चा १०.०४ ग्रॅम वजनाचा निव्वळ एम.डी./मेफोड्रॉन हा अंमली पदार्थ अनाधिकाराने, बेकायदेशिर रित्या कब्जात बाळगला असताना मिळुन आला व सदरचा एम.डी./मेफोड्रॉन हा अंमली पदार्थ त्याने त्याच्या ओळखीचा ताज याचेकडुन घेतला म्हणुन.
त.अधिकारी/अंमलदार	:-	पोउनि पाटील ९१५८०८३६६७